# शब्दांच्या वाटेवरती

शिवदास आष्टेकर उर्फ कल्पिकी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहेत

# शब्दांच्या वाटेवरती

काव्यसंग्रह

## शिवदास गणपत आष्टेकर

# शब्दांच्या वाटेवरती


## कवी: शिवदास गणपत आष्टेकर

बी-३०२, स्वामी संकुल सोसायटी

नवभारत शाळे जवळ, शिवणे

पुणे -२३

फोन नंबर: ९८६०७०२२३१

**मूळ पत्ता**

तालुका - अंबाजोगाई, जिल्हा - बीड

महाराष्ट्र

**Blog: https://www.facebook.com/100887435524295**

**ईमेल:** Shivdas.ashtekar@gmail.com


## मुखपृष्ठ: निखिल शिंदे


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे, तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages, and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन: २८ एप्रिल २०२२ (चैत्र कृ. त्रयोदशी शके १९४४)

©esahity Pratishthan® 2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई -साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

# ओळख

वाचनाची आवड शालेय जीवनापासूनच झाली, गोष्टीची पुस्तके वाचता वाचता कधी पुस्तकाची आणि साहित्याची आवड निर्माण झाली समजलंच नाही. दिसेल ते पुस्तक वाचायचं हाच ध्यास, सुहास शिरवलकरांच्या रहस्य कथा, पु.ल. चे मनोरंजक पण मनाला भिडणारी सगळी पुस्तक वाचून काढली. अनेक विषय डोळ्याखालून निघाले, काही मनामध्ये कोरले गेले, काही रुजले काही विस्मरणातहि गेले. पण आवडता लेखक म्हणाल तर व. पु. काळे माणूस, समाज, मन आणि जगण ह्याच व्यापक रूप पण अगदी सोप्या आणि सहज शब्दात मांडायची त्यांची शैली केवळ अफलातूनच.
त्यांचा एक- एक शब्द आणि लेखन म्हणजे अगदी अमृत रुपी मिळालेला खजिना आहे. कविता करायची आवड अगदी दहावीत असताना पासूनच लागली होती. जशी जमेल तशी तयार करायचो, नंतर कवितेला वेगवेगळे विषय मिळत गेले, अर्थ शोधात राहिलो, शब्द भेटत गेले आणि कविता बनत गेल्या. एक-दोन कवितांची मैफल पण गाजवल्या कॉलेजच्या काळात. बरेच विषय सुचायचे तसे लेख लिहले, सोशल मीडिया वर छोटे छोटे लेख पण लिहतो, पण पाहिलं प्रेम कविते वरच म्हणून हा सर्व प्रपंच.

**शिवदास गणपत आष्टेकर**

## प्रिय वाचक मित्रांनो,



जीवन जगत असताना आपल्याला कोणत्या तरी गोष्टीची ओढ, आस लागलेली असते. आपण आनंद शोधण्याच्या प्रयत्नात असतो. कधी सुखं तर कधी दुःख या गोष्टींचा आपल्या आयुष्यामध्ये निरंतरपणे प्रवास चालू असतो. ग्रामीण भागातून जेव्हा घरची हालाकीची परिस्थिती असताना ही उराशी एखादं मोठं स्वप्न घेऊन निघालेला मी, अजून हि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतोय. ग्रामीण भागात एका प्रतिकूल परिस्थित जगत असताना समाजाकडे पाहताना मला जाणवलेल्या गोष्टी आणि त्याच्या वर बनत गेलेल्या कविता. जे मनाला उत्स्फूर्तपणे सुचलं, मग ते जीवनाच्या अनुभवातून असो किंवा स्वप्नाच्या दुनियेतून, ते उत्स्फूर्त विचार, भावना अन स्वप्नंही उतरवत गेलो पानांवर.....

ज्यातून घडत गेला एक कविता संग्रह .... कवी मनाच्या भावना तुमच्या समोर ठेवताना आनंद वाटत आहे... या पुस्तकात निरनिराळ्या विषयांवरच्या काही निवडक कविता प्रस्तुत केल्या आहेत.

शिवदास गणपत आष्टेकर

## शब्दार्पणमस्तु

शब्द हरवले तर संपेल सारे
निःशब्द मला व्हायचे नाही
जगलो मी या शब्दांच्या दुनियेत
सोडून त्यांना राहायचे नाही

* शब्द.... भावना व्यक्त करण्याचे एक प्रभावी माध्यम, ते नसतील तर,

आपण साहित्यिक लोक अजून हि या शब्दांमुळे अजूनही जिवंत आहोत,

म्हणून ज्या-ज्या सर्व शब्दांची कविता तयार झाली, त्या सर्व शब्दांना माझा

पहिला-वहिला कवितासंग्रह समर्पित *

# काव्यानुक्रम


1 रीत जगण्याची
2 माझ्या आयुष्यातील ''ती''
3 अतिक्रमण
4 सावली
5 माझा शेतकरी राजा
6 काळी माती
7 दोस्त
8 आई अंबे
9 माझी अप्सरा
10 प्रेमाचा झरा
11 फक्त तूच
12 मी माझाच
13 संकल्प
14 मनस्थिती
15 बालपण
16 एक निवांत संध्याकाळी
17 दिशा
18 गुढी
19 शब्दात
20 प्रवास
21 पैसा
22 प्रतिबिंब
23 झरा
24 तुझेच नाव
25 ती
26 मला खरंच करायच आहे

# रीत जगण्याची

मोकळ्या अंगणात सारवल जाई
शेजारच्या गोठ्यात हंबरती गाई
अंगणात तुळस बहरुनी जाई
सांजराती चा दिवा प्रकाश देई

ओट्यावर गप्पांचा फड रंगायचा
गावातल्या देवळात देव बसायचा
रातच्या कीर्तनाचे मन शुध्द होई
साऱ्या ईडा पिडा वेशीबाहेरच राही

बदलत्या जगात दुरावली माणसं
जगणं हे कसं बदलूनिया गेलं
कधी होत सुखी संसाराच जाळ
समद सोडूनी फक्त जोडपच राहील

शेजारच दार कधी उघडत नाही
चार भिंतीत जीव गुदमरून राही
शब्द थांबले बोलायचे वेळच नाही
दिस-रात फक्त धावण्यात जाई

तोड तू आता भिंत विचारांची
जोड परत नाती माणसांची
घेतला हाती- हात सोडू नको
एका चुकी पायी डाव मोडू नको

# माझ्या आयुष्यातील "ती"

घासातील घास जिने मला भरवले
माझ्यासाठी स्वतःचे आयुष्य हरवले
विचार नाही केला, नाही पर्वा केली कोणाची
कमी पडेल उपमाही तिला जिजाऊंची

उघड आभाळ, पोरकी जमीन
हक्काचा आधार तिने मिळविला
क्षणात एका, सारे निघुनिया गेले
भविष्याचा पाया तिने रचविला

साथ तिची मला जीवनात लाभली
माझ्या आयुष्याची आहे ती सावली
तिने भावनेचा अर्थ मला शिकवला
हा जोडीदार मला सात जन्मासाठी भेटला

नाही पंख मला उडायला पण
मन वाऱ्यावानी उरू लागलं
मला भेटली नाहीं कोणी अशी
जिच्यासाठी मन झुरू लागलं

ती आली, तिने जिंकल सार
आयुष्यातील अंधार मिटूनिया गेला
विसरलो मी दुःख कष्ट सारे
पाहून निरागस रूप तुझे हसरे

तुझ्या हास्यात मी शोधतो मला
तुझ्या बालपणात जीव माझा रंगला
किती गोड हास्य, अन शब्द लडिवाळ

प्रेमाचा नवा अर्थ समजुनी गेला

# अतिक्रमण

जे नको वाटत होत तेच झालाय
माझ्याघरी आज अतिक्रमण आलाय
नाही मागणार मी तुमच्यासमोर भीक
पण हे खरय माझ घर उध्वस्त झालय

प्रत्येक क्षणाला बोचणारी जाणीव
एकदाची आज खरी झाली आहे
माणसांना माणसाचा हिशोब नसला तरी
आमचा तो परमेश्वर वाली आहे

चार भिंती पडल्या आज तरीही
आमच घर मात्र शाबूत आहे
मोडून पडला आहे आमचा संसार
पण आमच मन काबूत आहे

झाली आमच्या संसाराची लख्तरे
तरीही आम्ही मोडून नाही पडणार
लक्षात राहूद्या तुम्ही विसरू नका
एक दिवस आमची पोर पण नाव काढणार

नाही राहील डोक्यावर छप्पर पण
खाली आहे जमीन अन आकाश आहे वर
मनातल सांगतो खोट बोलणार नाही
आम्हालाही हवय चार भिंतीच घर

# सावली

राहून राहून वाटत
मन आभाळ भरुन दाटत
तू नाहीस हे कळताच
काळीज माझ फाटत

डोक्यावरचा हात तुझा
आता हाताला लागत नाही
आकाशाकडे बघून मी
तुझी अजूनही वाट पाही

तुझ्या आठवणी विना
एक दिवस जात नाही
किती दिवस झाले तरीही
डोळ्यातलं पाणी थांबत नाही

तुझ्या माझ्या आठवणीचा
हा झरा अखंड वाहू दे
नाहीस तू सोबत तरीही
तुझी सावली अशीच राहू दे

# माझ्या शेतकरी राजा

सरकारच्या कुबड्या घेऊन
मर्दा तू असं जगू नको
लाचार तोंड घेऊन कोणापुढे
सारखं रडत तू बसू नको

भविष्याची बात कर
आधुनिकतेची कास धर,
तुझी अवस्था समद्याना कळु दे
पाणी सत्याचं लोकांच्या गळ्यापर्यंत वळू दे

असा कसा र तू येडा
सारखा दुःखी राहतोस
आपल लेकरू मरताना
उघड्या डोळ्यांनी पाहतोस

नाही भेटला पक्वान्न
तर चटणी भाकरी खा
माझ्या शेतकरी राजा
माझ्या मर्दा तू सुखी राहा

लोचनी पाणी, मुखकमल हसरे
शेतकरी माझा दुःख कसे विसरे
पाहूनिया तुझं कर माझे जुळती
कष्ट तुझे अन अन्न मज मिळती

# काळी माती

काळया काळया शेतामंदी
रंगी बेरंगी पीक येती
नाही कसलाच भेदभाव
सगळे आनंदाने राहाती

कापूस पांढरा येतो र
होत ज्वारीचं सोन
माझा शेतकरी राजा
गातो आनंदाचं गान

रोज गाळूनिया घाम
मशागत करावी लागते
पोटच्या लेकरा परीस
काळजी घ्यावी लागते

उभ्या आभाळा खाली
लेकरू एकटं सोडलं
जशी घेतली काळजी
पीक जोमाने वाढलं

# दोस्त

मला प्यारी हाय
हि जिंदगानी ची व्यथा
माज्या देवा सांग
मले दोस्तीची कथा

करीन तुझ्यापायी
हि जिंदगी म्या दानं र
पदरात टाक मज्या
दोस्तीच वान र

न सांगताबी त्याला
कळू दे की सारं
कधी नको वाटु देउ
दोस्त डोईवर भार

उन्ह पाऊस वार्याची
फिकीर मला नाही
माझ्या पाठीर मजा
दोस्त उभा हाई

उभ्या जिंदगानीत एक
सपान मला बघू दे
फक्त एकदाच देवा
मला दोस्त म्हणून जगु दे

फक्त एकदाच देवा
मला दोस्त म्हणून जगु दे

# आई अंबे

सुंदर हे रूप तुझ,
साधा तुझा भाव ग
आई योगेश्वरी देवी,
तुझ्या भक्ताला पाव ग ||

नाही काही मागणं
माझ हेच तुला सांगणं
भरकटल्या मनाला,
वाट तू दाव ग ||

आई अंबे जगदंबे तुझी
लीला अपरंपार ग
हाती घेऊनी शस्त्र
करी विनाशाचा नाश ग ||

जाग माये जाग आता
किरपा आम्हावर होऊ दे
माया तुझी या भक्तावर
आयुष्यभर राहू दे

तूच लेकरू तूच माय
दुधावरील तूच साय
ऋण तुझे फेडणे मला
या जन्मी तर शक्य न्हाय

# माझी अप्सरा

माझिया मना तूच सांगना
असा काय केला मी गुन्हा
तिच्या आठवणीत राहून
अंग शहारूनी जाई पुन्हा

नकळत गाठ तिची पडली
नजरेला नजर ही भिडली
शब्द सारे ओठांवर अडले
समजेना असे काय घडले

जशी ती माझ्या जीवनात आली
नव्याने आयुष्याची सुरुवात झाली
आई बाबांची लाडकी बाहुली
झाली माझ्या आयुष्याची सावली

शब्दा पलीकडले नाते आपले
जपूनी ठेव मोडू नको
खूप लांबचा प्रवास आहे
अर्ध्या वरती सोडू नको

अजून तुला कळले नाही
प्रेमाचा तू झरा ग
तू प्रेमिका लावण्यवती
या धरती वरची अप्सरा ग

## प्रेमाचा झरा


अजून एक वर्ष कस पटकन सरल....
तुझ्या प्रेमाच माप जरा जास्तच भरल
वाढली माया अन ओढ तुझी लागली
प्रेमाचा झरा हा फक्त वाढतच गेला

दूर काही क्षण हे अनायासे गेले
नवे जिवन घेउनिया परत ते आले
लागली आयुष्यात एक नवी चाहूल
आले या जगात चिऊ चे पहिले पाऊल

तूझ्या संग मस्त जिंदगी ही झाली
जीवनात नवे-नवे रंग घेऊन आली
येत्या पावसात तुझी साथ अशीच राहू दे
प्रेमाच्या सागरात मला वाहतच जाऊ दे

साथ तुझी लाभली, मन माझं हरल
या सुखी संसार समोर, दुःख माझ सरल
वर्षा माघुनी वर्ष पूर्ण होत गेली
संसाराची गाडी बहरत आली

तुझ्या सोबतीचा प्रत्येक क्षण
नवीन आयुष्य देऊन जातो
बंद अश्या त्या ओठांवर
मखमली हास्य घेऊन येतो



## फक्त तूच

हा चंद्र हि तूच
तूच माझा तारा
तुझ्या एका स्पर्शासाठी
आसुसलेला बेभान वारा

रातराणीचा गंध हि तूच
मनाचा रेशीमबंध हि तूच
वेड लावी या जीवा
असा वेगळा छंद हि तूच

एक वेडावलेली पहाट तू
एक रम्य सायंकाळ हि तूच
एक खवळलेला समुद्र तू
एक वाहती नदी हि तूच

या आयुष्याचे स्वप्न तू
या जीवनाचे सत्य हि तूच

## मी माझाच

सुरवंटांतील फुलपाखरू होता आलं असत तर
भटकलो असतो मी तुझ्या सोबत जीवनभर
एक महाकाय वटवृक्ष झालो असतो तर
जन्मभर तुला सावली देता आली असती

आकाशातील चंद्र-सूर्य मी असतो तर
दिवस रात्र एक केली असती तुझ्यासाठी
मला कोणी पतंग बनवलं असत तर
खूप उंच उंच उडवलं असत मी तुला

पक्ष्याप्रमाणे माझं जीवन असते तर
पंख दिले असते तुला आकाश गाठण्यासाठी
पण मी माझाच राहिलो हे बर झालं कारण
तुझ्या मनात आता मीच घर करून राहिलोय

## संकल्प

अजून एक वर्ष सरत आल
आयुष्याच एक पण भारत आल
जाता जाता मागे वळून पाहायचं
झाल्या चुकामधून नवीन शिकायचं

लागली चाहूल नवीन वर्षाची
तरी या वर्षाला आठवणीत ठेवायचंय
घडल्या सुखः -दुखाच्या घटना यात
वाईट सोडून चांगल जपायचय

दिसतेय एक नव-कोर पान पुढे
म्हणून या पानाला नाही विसरायचं
गतवर्षीला मनात ठेवून येणाऱ्या
नवयुगात स्वतला घडवायचंय

## मनस्थिती

अस्वस्थांचे थवे बांधले
छळणारयांचा हात मोकळा
सोसून-सोसून हा देह पडला
तरीही मर्दा तू उठू नको

छळणारयांचा छाताडावरती
पाय ठेउनी तू लढू नको
भरल्या त्या अंगणी
रक्ताची नदी वाहिली

थांबविण्या हि दुर्जन कीर्ती
सुदर्शन-चक्र तू फिरवू नको
झाली कत्तल मुडदे पडले
मुडद्यावरती त्या कितीही रडले

संपविण्या हि कत्तल
राम-धनुष्य तू पेलू नको ....
सोसून-सोसून हा देह पडला
तरीही मर्दा तू उठू नको

# बालपण

बालपणाची आठवण आजही होते,
तरुणाईचे मन त्यात हरवून जाते,
वाटते अजूनही बालपणात आसवे,
आनंदापारी दुसरे काहीच नसावे.

विश्व हे माझे आई आणि बाप,
कशाची चिंता न कशाचाच ताप.
चेहऱ्यावरती स्मितहास्य असावे
नाहीतर रडून घर डोक्यावरी घ्यावे.

आजही वाटते लहान होऊनिया जावे
नको ते दुख, फक्त आनंदात जगावे.

## एका निवांत संध्याकाळी

दररोजच्या आयुष्यातील
एका निवांत संध्याकाळी
आजपर्यंतच्या जगण्याचा
हिशोब लावत बसलो होतो

गोळाबेरीज करता करता
हातात काहीच मावल नाही
जगण्याची हीच रीत पाहून
मी हळूच हसलो होतो

जसे क्षण जीवनात आले
तसेच ते निघूनही गेले
आठवणीच्या रुपात ते
स्वत:लाच मागे पाहत होते

कितीही हिशोब मांडला तरी
हाती काहीच उरत न्हवते
आयुष्य अजून सरले न्हवते
अजून जिंकायचे बाकी आहे !!

# दिशा

प्रत्येकाला अस का वाटत
नक्कीच कुठे तरी अडतय,
कोणतेही कारण नसताना
माझ्याच बाबतीत हे का घडतंय.

काहीच चूक नसताना
... आपण स्वत:हून हरायचं,
समोरच्याने मात्र मीच बरोबर
अस सांगत सगळीकडे फिरायचं.

मला मान्य आहे जरा अवघड असत
तरीही 'नाही' म्हणण शिकायला हव,
आयुष्याकडे परत एकदा
आपण नव्याने पाहायला हव !!

## गुढी .....

आपण सतत उंच उंच जाऊ
तरीही पाय जमिनीवरच ठेऊ
साडी चोळी अर्पण करुनी
घरच्या लक्ष्मीला सन्मान देऊ

साखर हार घालुनी गुढीला
मनामनात गोडवा ठेऊ
कलश प्रतीक भाग्याचे
दिली ओंजळ भरून घेऊ

काठीचा आहे भक्कम आधार
मोठ्यांच्या सावलीत राहू
अशीही गुढी उभारू भाग्याची
आयुष्यात भर पडेल आनंदाची


## शब्दात....

एका कवितेच्या कवीला
दुसऱ्या कवीने विचारलं
काय भेटत तुला
हे असं शब्दात लिहून

तो बोलला
कधी गालावर हास्य,
कधी येतं डोळ्यात
पाणी तिच्याकडे पाहून

माझ्या मनातलं सारं
मला सांगता येत
लहान मूल होऊनी
परत रांगता येत

तिला शब्दात बांधताना
मी मलाच विसरतो
आकाशातले ढग बनून
पाऊस होऊन बरसतो



# प्रवास

बागेत उडणाऱ्या फुलपाखरांची
मजा काही औरच असते

आकाशात उंच उडणाऱ्या घारींची
तऱ्हा काही न्यारीच असते

माणसांचे जीवन काही असंच असतं
यात कधी सुख तर कधी दुःख असतं

सुखदुःखाच्या वाटेवरती
न डगमगता पुढे चालावे

या साऱ्या कल्पनेच्या दुनियेत
हे जीवन आनंदाने जगावे

हा जीवनाचा खडतर प्रवास
कधीतरी संपणारा असतोच

# पैसा

या देशात पैसा आहे मोठा
त्याच्यासमोर माणूस आहे छोटा
गरिबांवर करतील श्रीमंत राज
श्रीमंत बनवून त्यांना चढेल माज

पैशामुळे भांडणे वाढतील
न्यायालयात खटले चालतील
पैशासाठी होते अपहरण
त्यांचे येथे जवळ मरण

पैशासाठी होतो कोणाचाही खून
कोणालाही कधीही टाकतात मारून
त्यामुळे देशात पैसा आहे बेकार
त्यासाठी कितीतरी तडपतात कामगार

ज्याचा आहे खिसा पैशाने गच्च
त्यालाच आहे मान सर्वात उच्च
म्हणून म्हणतात काहीही गमवा
पण थोडे तरी पैसे जरुर कमवा

## प्रतिबिंब

का जगतोस असा
दुसऱ्याच्या सांगण्यावर
यावरून एकच समजतं
तुझं काहीच अस्तित्व नाही

का करत नाहीस तू
तुझ्या मनाला पटेल ते
यावरून एकच दिसतं
तुझ्यात कमी आत्मविश्वासाची

का पळतोस असा तू
इतरांच्या पाठीमागे
यावरून एकच समजतं
तुझ्यात कमी हिमतीची

सोडून दे ही वाट जुनी
कर एक इतिहास नवा
आता आहे एकच ध्यास
अजिंक्य तू व्हावा

कारण........

विश्वात तुझी किंमत
फक्त एक टिंब आहे
पण इथं प्रत्येकाच्या मनात
तुझं एक प्रतिबिंब आहे

# झरा

जीवन एक झरा आहे नेहमी वाहतोच
पाण्याने कधी थांबायचं शिकलय का?
खूप खूप उंच जाणार झाड
स्वतःच्याच कमरेत कधी वाकलय का?

सगळे मिळत असताना देखील
माणूस समाधानी झालाय का?
रडल्यावर आईने कुशीत घेतल्यावर
गालात हसतानाच मुल पाहिले का?

जीवन जगताना सारखं वाटत राहतं
भूतकाळात माझं काही हरवलय
खूप रडवल असेल सगळ्यांना
पण एकदा तरी कुणाला हसवलय का

स्वतः मध्ये जगताना तुम्ही एकदा तरी
दुसऱ्यासाठी काही तरी मागितलय का

## तुझेच नाव

गुंतलो होतो मी तुझ्यात
ती चूक नव्हती माझी
क्षणाक्षणाला साथ देणारी
ती प्रित होती तुझी

वाटले मला एकेकाळी
कुशीत तुझ्या असावे
दोघेच फक्त आपण तिथे
तिसरे कोणी नसावे

पण

अंगणातल्या रांगोळीत
तूच रंग भरले
होत आली संध्याकाळ
आणि आयुष्य तिचे सरले

लक्षात ठेव एकच आता
सोडून जाताना माझे गाव
माझ्या हृदयावरती
कोरले होते तुझेच नाव

# ती

जशी उन्हामध्ये हळूच
येते पावसाची सर
तशी असावी सोबत
ती माझ्या आयुष्यभर

जणू माझीच ती सावली
अशी असावी तिची छाया
दोन क्षणाचे ते भांडण
पण असावी जीवापाड माया

एका क्षणासाठी पण
जीव खाली वर व्हावा
दोघांचा जसा एकमेकात
श्वास अडकून राहावा

तू आणि मी तिथं
दुसरं कोणीच नसावं
एकमेकांचं ते प्रेम
फक्त डोळ्यातूनच दिसावं

# खरच मला एक करायच आहे

खरच मला एक करायच आहे ....
एकदा हे जग जिंकायचं आहे
पण हे जग जिंकताना मला
एकदा तरी हरायचं आहे.

खरच मला एक करायच आहे ....
माझे लक्ष्य पार पडायचे आहे
हे लक्ष्य पार पाडताना मला
शेवट पर्यंत लढत राहायचे आहे .

खरच मला एक करायच आहे ....
सर्वांना प्रकाश दयायचा आहे
पण प्रकाश देण्यापूर्वी मला
दिव्यासारखे जळत राहायचे आहे .

खरच मला एक करायच आहे ....
पतंगासारखे उंच उडायचे आहे
पतंगासारखे उंच उडताना दोरी बनून
जमिनीवर पण राहायचे आहे .

खरच मला एक करायच आहे ....
मला प्रेमात पडायचं आहे
पण खूप खोल जाण्यापूर्वी
परत काठावर परतायचे आहे.

चंद्र, फुले, मृग, तारे येती
जसे धरित्रीवर
तशी कविता रिझवित येते
ई साहित्यावर

खुप साऱ्या कविता वाचण्यासाठी
आपल्या सुंदर कवितांचा आनंद इतरांना देण्यासाठी

ई-काव्यमैफ़ल

www.esahity.com
esahity@gmail.com
9987737237(Whatsapp)

-